**अतारांकित प्रश्नोत्तरांची ३५ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## संजय गांधी निराधार योजनेचे आपले सरकार पोर्टलवर अर्जदारांना योजनांचा लाभ वेळेवर मिळण्याबाबत

**(१) ३२ (३०-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुरु असलेल्या संजय गांधी निराधार योजनेचे आपले सरकार या पोर्टलवर मुंबईत माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये ५२११ प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महिन्यात मुंबईत आपले सरकार पोर्टलवर आलेल्या एकूण ५५७१ अर्जापैकी केवळ ३६० अर्जांनाच मंजूरी दिली असल्याचे तसेच श्रावण बाळ याजेनेच्या केवळ ७५६ अर्जांनाच मंजूरी देण्यात आल्याने विधवा, परित्यक्त्या महिला, अपंग, वृध्द लाभार्थ्यांचे प्रकरणे प्रलंबीत राहिल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सामान्य प्रशासन विभागातर्फे प्रशासकीय कामाचा आढावा घेण्यासाठी मासिक अहवाल प्रकाशित करण्यात येत असून त्यामध्ये मुंबईतील विविध योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जापैकी मंजूरी देण्याचे प्रमाण अत्यंत अल्प असून केवळ ४५ टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान विविध जिल्ह्यांतून उत्पनाचे दाखले ५०४९१ अर्ज, पोलिस दलाकडून मिळणाऱ्या चारित्र्याच्या प्रमापत्राचे ७७६५३ अर्ज, अधिवास प्रमाणपत्र ३०२७४ अर्ज व नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र ९४०६ अर्ज प्रलंबित असल्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून कामांमध्ये दिरंगाई होत असल्याने सामान्य नागरीकांमध्ये शासनाविरुध्द नाराजीची व संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार राज्यासह मुंबईतील विविध योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांना त्वरीत मंजूरी देऊन सर्वसामान्य जनतेला आर्थिक दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (०६-०३-२०२६) :** (१) मुंबई शहर जिल्ह्यामध्ये नोव्हेंबर, २०२४ अखेर संजय गांधी निराधार अनुदान योजना १४७ व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना ६१ असे एकूण २०८ अर्ज प्रलंबित होते.

(२) मुंबई शहर जिल्ह्यामध्ये नोव्हेंबर, २०२४ अखेर २०८ प्रलंबित व नविन १२६ प्रकरणांपैकी जानेवारी, २०२५

अखेर संजय गांधी निराधार अनुदान योजना २१० व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना ९४ प्रकरणांना मंजूरी देण्यात आली आहे. ३ प्रकरणे अपात्र असल्याने नामंजूर करण्यात आली व एकूण २७ प्रकरणे प्रलंबित होती.
(३) हे खरे आहे. तथापि, मुंबई शहर जिल्ह्यामध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत जानेवारी, २०२५ अखेर अर्ज मंजूरीचे प्रमाण ९१ % आहे.
(४), (५) व (६) सामान्य प्रशासन विभागाने प्रकाशित केलेल्या मासिक अहवालानुसार माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये विविध जिल्ह्यांतून उत्पन्नाचे दाखले ५०४९१ अर्ज, पोलिस दलाकडून मिळणाऱ्या चारित्र्याच्या प्रमाणपत्राचे ७७६५३ अर्ज, अधिवास प्रमाणपत्र ३०२७४ अर्ज व नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र ९४०६ अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

मुंबई शहर जिल्हयात माहे नोव्हेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीतील प्रलंबित प्रकरणे उत्पन्न प्रमाणपत्र अर्ज ४३७०, वय व अधिवास प्रमाणपत्र अर्ज ५३८१, नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र अर्ज ५०२ असे एकूण १०२५३ प्रकरणे असून यापैकी ९१५२ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला असून ११०१ प्रकरणे जानेवारी अखेर प्रलंबित आहेत. प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन विहीत मुदतीत अर्जदार/लाभार्थी यांना लाभ देण्यात येत आहे.

---

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील नागरिकांकरिता मुलभूत सोयी-सुविधांमध्ये नियम व अटी शिथिल करण्याबाबत

**(२) १७८९ (२५-०४-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी राष्ट्रीय **उद्यान** बोरिवली (पूर्व)) केतकीपाडा, धारखाडी, दहिसर पूर्व, जानूपाडा, वैभवनगर, पांडे कंपाऊड, दामूनगर, भीमनगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, गौतम नगर व कांदिवली (पूर्व) या वन विभागात राहणाऱ्या नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा मिळण्यासाठी नियम व अटी शिथिल करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान तसेच यापूर्वीही वारंवार संबंधित विभागाकडे व तत्कालीन मा.वने मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत प्रशासनाचे नेहमीच दुर्लक्ष होत असल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१), (२), (३) व (४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन जमिनीवरील अतिक्रमीत क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्याबाबत वेळोवेळी मागणी केली जात आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे. त्यानुसारच शासनामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टिपेश्वर (जि.यवतमाळ) येथील अभयारण्य परिसरात व्याघ्र प्रकल्प उभारुन बफर झोनमधील गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) ४९५२ (२५-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिपेश्वर (जि.यवतमाळ) या अभयारण्यातून होणारे वाघांचे स्थलांतर रोखण्यासाठी सादर करण्यात आलेला व्याघ्र प्रकल्पाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टिपेश्वर अभयारण्यातून आतापर्यंत ५ ते ७ वाघांना तेलंगणा, कर्नाटक, चाळीसगाव, बुलढाणा व चंद्रपूरकडे स्थलांतर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच टिपेश्वर अभयारण्यांतर्गत वाघांची संख्या २० च्या वर असून आजपर्यंत व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देऊन बफर झोनमधील गावांचे पुनर्वसन करण्याबाबत नागरिक व लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अभयारण्य परिसरात व्याघ्र प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत तसेच व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देऊन बफर झोनमधील गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०२-२०२६) :** (१) टिपेश्वर अभयारण्याला व्याघ्र प्रकल्प घोषित करण्याबाबत उप विभागीय अधिकारी, महसूल विभाग पांढरकवडा यांना दिनांक ११ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्याबाबत नेमणूक करण्यात आली आहे. चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(२) टिपेश्वर अभयारण्यातून नविन प्रादेशिक क्षेत्राच्या शोधात वाघांच्या स्थलांतरणाच्या अनुषंगाने मागील ५ वर्षाच्या कालावधीत ५ ते ७ वाघांचे स्थलांतरण तेलंगना, बुलढाणा, चाळीसगाव, सोलापूर, धाराशिव इ. भागामध्ये स्थलांतरण झाले आहे.

(३) व (४) अखिल भारतीय व्याघ्र प्रगणना २०२२ नुसार टिपेश्वर अभयारण्यात ११ वाघ तसेच पांढरकवडा प्रादेशिक विभागात १३ वाघ आढळल्याची नोंद आहे. टिपेश्वर अभयारण्याचे आत असलेले टिपेश्वर व मारेगांव या गावाचे पुनर्वसन २०१२ ते २०१४ या दरम्यान पूर्ण करण्यात आलेले आहेत. टिपेश्वर अभयारण्य व्याघ्र प्रकल्प नसल्याने त्याला अधिसूचीत बफर क्षेत्र नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय शिक्षण धोरणाअंतर्गत शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाच्या अंमलबजावणीबाबत**

**(४) १०३८० (०८-०९-२०२५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा शाळा पातळीवरील प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत माहे मार्च, २०२५ मध्ये शिक्षकांच्या क्षमतावृद्धीसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षणामध्ये एका वर्गात ४० ते ५० शिक्षकांचे छोटे गट असण्याऐवजी मुंबईतील काही ठिकाणी २०० ते ५०० शिक्षकांना एकत्र करून मोठ्या सभागृहात प्रशिक्षण देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोठ्या संख्येतील शिक्षकांना एकत्र प्रशिक्षण देण्यात आल्यामुळे प्रत्यक्ष क्षमतावृद्धीच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाले असून, याचे मूल्यमापन व चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२७-१०-२०२५) :** (१) होय,

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी क्षमतावृध्दीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राज्यस्तरीय व प्रादेशिक विद्या प्राधिकरण व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेमार्फत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण अनुक्रमे दिनांक २० ते २४ जानेवारी, २०२५, दिनांक ३ ते ७ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक १० फेब्रुवारी ते मार्च, २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले.
(२) हे खरे नाही.

शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई पश्चिम विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग यांच्यामार्फत एका प्रशिक्षण वर्गात एकूण ५० ते ६० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. बृहन्मुंबई उत्तर विभाग व दक्षिण विभाग यांच्या कार्यक्षेत्रात प्रशिक्षण पहिल्या व दुसरा टप्प्यात अनुक्रमे दिनांक ११.२.२०२५ ते १५.२.२०२५ व दिनांक १७.२.२०२५ ते २२.२.२०२५ या कालावधीत पुरेश्या वर्गाखोल्यांत आयोजित केले होते. प्रशिक्षणाच्या तिसरा टप्प्यानंतर इयत्ता १० वी शालांत परिक्षा सुरु असल्यामुळे ज्युनियर कॉलेज विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वर्गखोल्यांमध्ये १०० प्रशिक्षणार्थींना बैठक व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ग्रामीण क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांना जमीन वापराच्या प्रत्यायोजित केलेल्या शक्ती रदद करण्याबाबत

**(५) १०५७९ (०८-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ग्रामीण क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी ठाणे व रायगड यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९९६ च्या चौथ्या प्रकरणातील अधिसूचीत क्षेत्राच्या विकास नियंत्रण आणि जमीन वापराच्या प्रत्यायोजित केलेल्या शक्ती रदद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन , त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर पत्रावर शासनाने मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे तसेच नगर रचना संचालनालयाचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अभिप्राय प्राप्त झाले असून नगर रचना संचालनलायाचे अभिप्राय प्राप्त होणार आहेत, त्यानुसार अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर मा.आ.श्री.रईस शेख,

विधानसभा सदस्य यांचे पत्राचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) सदर पत्रावर कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उदभवत नाही.

---

## बृहमुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम २०२ मध्ये सुधारणा करण्याबाबत

**(६) १०५८८ (१७-०६-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहमुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम २०२ मध्ये सुधारणा करुन मालमत्ता करांवर आकारण्यात येणारी दंड आकारणी दि १ एप्रिल, २०२२ पासून प्रतिमाह २ टक्के ऐवजी प्रतिमाह १ टक्का दराने आकारण्याबाबत मा.नगर विकास मंत्री दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधिनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम २०२ मध्ये सुधारणा करुन मालमत्ता करांवर आकारण्यात येणारी दंड आकारणी दिनांक०१.०४.२०२२ पासून प्रतिमाह २ टक्के ऐवजी प्रतिमाह १ टक्का दराने आकारण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका व शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील दयानंद आर्ट कन्या विद्यालयात मुस्लिम विद्यार्थिनींना प्रवेश नाकारला जात असल्याबाबत

**(७) १०५९९ (०८-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जरीपटका भागातील दयानंद आर्ट कन्या विद्यालयात मुस्लिम विद्यार्थिनींना प्रवेश नाकारण्याचे धोरण अवलंबले जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यालय अल्पसंख्याक गटातील असतानाही विद्यार्थिनींना धार्मिक भेदभावाची वागणूक दिली जात असून शाळा सचिवांनी शिक्षकांना तसे तोंडी आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार, दोषी शाळा संस्था व व्यवस्थापनाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) चौकशी केली असता सदर शाळा/संस्थामध्ये याबाबत तथ्य आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वरळी ते आचार्य अत्रे चौक दरम्यान भुयारी मेट्रो मार्गावर पाणी शिरल्याबाबत**

**(८) १०६२७ (२०-०७-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी ते आचार्य अत्रे चौक दरम्यान सुरू करण्यात आलेल्या भुयारी मेट्रो मार्गावर दिनांक २६ मे, २०२५ रोजी मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मेट्रो स्थानकामध्ये प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या मार्गातील संरचना सुरक्षित ठेवण्याकरिता उभारण्यात आलेली संरक्षक भिंत कोसळल्याने स्थानकामध्ये पावसाचे पाणी जाऊन स्लॅबचा काही भाग कोसळला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला असतानाही कंत्राटदारामार्फत निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकारामुळे मेट्रो स्थानकात पाणी साचून चिखल झाल्याने प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला असून प्रवासी सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर घटनेचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींवर देखील व्यवस्थापनाकडून अरेरावी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामाची तातडीने दुरुस्ती करणेसह दोषी कंत्राटदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) दिनांक २६ मे, २०२५ रोजी झालेल्या पर्जन्यदृष्टीमध्ये आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकाच्या प्रवेश/निर्गम बाजूस बांधकाम चालू असलेल्या भागात बंद ठेवलेल्या पावसाच्या पाण्याचा नाला अचानक उघडला गेला. तसेच यासोबत उच्च भरतीची जोड मिळाल्याने स्थानकाच्या प्रवासी क्षेत्रात अनपेक्षितपणे पाण्याची गळती (Ingress) झाली आहे.
(२) भूमिगत प्रवेश/निर्गम स्थळी एका छोट्या बंधाऱ्यासारख्या भिंतीचे बांधकाम करण्यात आले होते, जे फक्त उघड्या खड्ड्यात थेट पडणारे पावसाचे पाणी अडवण्यासाठी होते. हा बंधारा अचानक उघडलेल्या नाल्यातून आलेल्या प्रचंड पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी डिझाइन केलेला नव्हता. त्यामुळे पाण्याची अचानक पातळी वाढल्यानंतर, ही भिंत कोसळली. परंतू यामुळे कोणतीही तात्पुरती रचना (जसे सेकंट पाईल्स) किंवा कायमस्वरूपी कामाचा भाग (भिंती/स्लॅब) कोसळला नाही. अचानक पाण्याची पातळी वाढल्याने बंधारा कोसळल्यानंतरच पाणी स्थानकाच्या भागात शिरले.
(३) निकृष्ट दर्जाचे काम किंवा कार्यान्वित पायाभूत सुविधेचा अपयश याचे कोणतेही पुरावे नाहीत. ही घटना ही पूर्णतः बाह्य कारणांमुळे घडली असून कामाच्या दर्जाशी संबंधित नाही. स्थानकाचे कार्यरत भाग आणि कार्यान्वित रचना पूर्णपणे सुरक्षित आणि अप्रभावित राहिली. फक्त काही सौंदर्यविषयक फिनिशिंगवर किरकोळ हानी झाली आहे. स्थानकाचा वापर कार्यात्मक हेतूसाठी तसेच  आचार्य आत्रे चौक येथील क्रॉस-ओव्हरवरून गाड्या वळवण्यासाठी सुरूच राहिला आहे.
(४) प्रवाशांची सुरक्षिततेची खबरदारी म्हणून दि २६ मे, २०२५ ते दिनांक ३१ मे, २०२५ दरम्यान आचार्य अत्रे चौक स्थानकावर प्रवाशांचे चढणे-उतरणे तात्पुरते बंद ठेवण्यात आले. मात्र मेट्रो गाड्या वळवण्यासाठी स्थानक कार्यरत राहिले आहे.

(५) अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्याची कार्यालयीन दत्परी नोंद नाही.
(६) पाणी उपसण्याची कामे त्वरित सुरू करण्यात आले कंत्राटदार अपयशी ठरल्यामुळे रुपये दहा लाखाचा दंड करण्यात आला आहे. मात्र बसवलेले पंप हे फक्त थेट पावसाचे पाणी हाताळण्यासाठी डिझाइन केलेले असल्याने या प्रमाणातील गळतीसाठी ते पुरेसे ठरले नसते. या घटनेचा प्रकल्पाच्या एकूण वेळापत्रकावर कोणताही परिणाम झालेला नाही आणि त्यामुळे कामात कोणताही विलंब नाही.

---

**अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अडचणी टाळण्याबाबत**

**(९) १०७६८ (१९-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागासह राज्यातील अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत वारंवार तांत्रिक बिघाड झाल्याने अर्ज नोंदणी व प्रवेश वेळापत्रकात विलंब होऊन विद्यार्थी व पालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे महाविद्यालयांतील अंतर, वाहतूक व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, इच्छित महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्यास दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण सोडण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांची प्रत्यक्ष शैक्षणिक क्षमता उपलब्ध असताना ऑनलाईन पोर्टलवर कमी प्रवेश क्षमता दर्शविल्यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गोंदिया जिल्ह्यासह विदर्भातील नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश मिळण्यास गंभीर अडचणी येत असल्याचे तसेच त्यामुळे शिक्षक अतिरिक्त होऊन शिक्षणावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे; यासंदर्भात विदर्भ ज्युनिअर कॉलेज टीचर असोसिएशनने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी निर्माण होणारे घोळ टाळण्यासाठी शासनाने तांत्रिक बिघाड, क्षमतेतील विसंगती, व ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-११-२०२५) :** (१) व (२) अंशत:खरे आहे :

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून संपुर्ण राज्यात इयत्ता ११ वी प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. प्रवेश प्रक्रिया योग्य पध्दतीने होण्यासाठी विभागामार्फत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

सदर प्रवेश प्रक्रीयेच्या न्यायालयीन प्रकरण, संकेतस्थळावर निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी यामुळे इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या कालमर्यादेचे महत्व लक्षात घेऊन संचालनालय स्तरावरुन कंपणीस वेळोवेळी संपर्क साधुन, बैठकांचे आयआयोजन करुन प्रवेशाशी संबंधीत विद्यार्थी व पालकांना पडणा-या तांत्रिक अडचणींचे समाधान करण्यात आले. तसेच प्रवेशाचे अर्ज भरण्यासाठी पुरेसा कालावधी वाढवून देण्यात आला आहे. तसेच संचालनालय स्तरावरुन तात्काळ उपाययोजना व पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन त्रुटींची पुर्तता करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी प्रत्येक विभागीय संचालक स्तरावरुन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून प्रवेश प्रक्रीया सुरु होण्यापुर्वी त्यांच्या शाळा व महाविद्यालयातील शाखांनिहाय पटसंख्येचा तपशील घेण्यात आला आहे. त्याची पडताळणी करुनच सदर जागांबाबत माहीती ही संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील अडचणी दूर करण्यासाठी कॉल सेंटर व सपोर्ट ई-मेल सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच ८ विभागस्तरावरील कार्यालयात टेक्नीकल सपोर्ट स्टाफ उपलब्ध करुन देण्यात आले आहे आणि विभागीय स्तरावरील कर्मचा-यांचे दुरध्वनी क्रमांक पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे व त्यानुषंगाने वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे. सद्यस्थितीत ११ वी च्या १३,४२४३८ प्रवेश निश्चित झाले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील उजणीच्या धरण भिंतीवर उगवलेल्या झाडामुळे धरणाला धोका असल्याबाबत

**(१०) १०७७६ (२४-०७-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणाची एकूण लांबी २५३४ मीटर आहे, ५६.४ मीटर ऊंची व ६.७ मित्र रुंदी आहे. धरणावरील विद्युत निर्मिती प्रकल्प कंदील बाजूच्या भिंतीवर १५ फुट लांबपर्यंत ४ ते ६ फुटापर्यंत उंच पिंपाळचे वृक्ष उगवले असून त्याकडे मागील ३ वर्षात ७.२ कोटींचा खर्च करूनही भीमा कालवा मंडळाचे त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उक्त प्रश्नाबाबत भीमा कालवा मंडळाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये उजनी धरणाच्या दगडी बांधकामातील अनुत्सारित भागात पिंपळाचे रोप आढळून आलेनंतर सदरचे रोप तात्काळ काढण्यात आले आहे. तसेच धरणमाथा व आजूबाजूच्या परिसरातील झाडे काढून टाकण्यात आली आहेत.

मागील “३” वर्षात उजनी धरणाच्या अनुत्सारित भागातील झुडपे / गवत काढणेच्या कामावर रु.१.६५ लक्ष व उजनी धरणाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता रु.५९०.०० लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी जागेवर बांधकामाचा महानगरपालिकेने घेतल्याबाबत

**(११) १०७८३ (१३-०८-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेने बगम पेठ येथील जागेत बीफ मार्केट, लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी घेतलेल्या आक्षेपा नंतर मटन मार्केट असा खुलासा करून सर्वेनंबर १०२२०, १०२२२, १०२२४, १०२२८ व नाल्याच्या आरक्षित जागा आणि भाजीमंडईच्या जागेवर व लोकांची घरे असलेल्या जागेवर व्यापारी संकुल बांधण्याचा निर्णय माहे दिनांक ४ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नातील जागेवर लोकांची घरे आहे व ती घरे पडून व्यापारी संकुल उभारणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मटन मार्केट साठी कोणती जागा उपलब्ध करून देणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

साखर पेठ, सि.स.नं. १०२२०, १०२२२, १०२२४, १०२२८ व नाल्याची जागा आरक्षण क्र.४/४ येथे आरक्षित जागेवरच भाजी मंडई व व्यापारी संकुल बांधण्याचे सोलापूर महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) बेगमपेठ सि. स.नं. ५९८५ व ५९८६ येथे सध्या अस्तित्वात असलेल्या मटण मार्केटच्या ठिकाणीच आणि पाच्छापेठ टी पी १ फायनल प्लॉट नं.४४ येथे सध्या अस्तित्वात असलेल्या मटण मार्केटच्या ठिकाणीच BOT प्रणालीमध्ये मटण मार्केट व व्यापारी संकुल विकासकाकडून बांधण्याचे नियोजन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एसटी महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक यांची बदली झालेली असतानाही रुजू झाले नसल्याबाबत

**(१२) १०८५० (०६-१०-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक यांची नागपूर येथे बदली आणि त्यांच्या जागेवर श्री.गभणे यांच्या नियुक्तीचे आदेश देऊन एक महिना उलटून गेला तरी श्री.गभणे हे पुण्यात रुजू न झाल्यामुळे एसटी मंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक पद अद्याप रिक्त असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कनिष्ठ कर्मचाऱ्यांना बदली सक्ती केली मात्र वरिष्ठ अधिऱ्काऱ्यांवर सक्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रादेशिक व्यवस्थापक पदावर नियुक्ती झालेल्या अधिकाऱ्याने तातडीने या पदावर रुजू होऊन कार्यभार पाहण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२७-०१-२०२६) :** (१), (२), (३) व (४) श्री. श्रीकांत गभणे यांची बदली रद्द करण्यात आली असून, श्रीमती अमृता शेखर ताम्हणकर, प्रादेशिक व्यवस्थापक (ता), सनियंत्रण समिती क्र.०२ (नाशिक, छत्रपती संभाजीनगर प्रदेश) यांची प्रादेशिक व्यवस्थापक (ता), सनियंत्रण समिती क्र. ०४ (पुणे प्रदेश) येथे विनंती बदली करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत पुणे प्रदेश येथे प्रादेशिक व्यवस्थापक या पदी अधिकारी कार्यरत आहे.

---

**दौंड (जि. पुणे) तालुक्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनींच्या सर्वेक्षणाबाबत**

**(१३) १०८७५ (०८-०९-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सततच्या जलसिंचनामुळे संपूर्ण राज्यासह दौंड (जि. पुणे) तालुक्यातील चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले असून शेतजमिनीने सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करण्याबाबत व त्यास निधीसह मान्यता मिळण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मूलनासाठी सुधारित धोरण निश्चित करून दौंड तालुक्यातील कामांना मान्यता देण्याबाबत दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत १३ चर योजनांचे सर्वेक्षण पूर्ण करुन मान्यतेसाठी दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन १९९१ नंतर पाझरचर करण्यासाठी मापदंड निश्चित करण्यात आले नव्हते, मापदंड अभावी नवीन चर योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यासाठी समितीची नेमणूक करण्यात आली होती, या समितीने केलेल्या शिफारशीनुसार पाझरचर योजनेसाठी आवश्यक मापदंड ठरविण्याचा प्रस्ताव वित्त व नियोजन विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बंदिस्त व उघडया पाझरचर योजनेसाठी आवश्यक मापदंड ठरविण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतची मागणी दिनांक ४ मार्च, २०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

नवा मुठा कालव्याच्या लाभक्षेत्रात दौंड तालुक्यात सन २०२२-२३ चे विभागीय कार्यालयाच्या खराबा क्षेत्र अहवालानुसार एकुण ३३०० हे. क्षेत्र पाणथळ व क्षारपड आढळुन आले आहे. याबाबत दौंड तालुक्यातील चिबड पाणथळ जमिनीचे सर्वेक्षण करुन चर योजना राबवणेबाबत वारंवार मागणी च्या अनुषंगाने बैठका घेण्यात येत आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

दिनांक १९/०८/२०२४ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई येथे उपमुख्यमंत्री (गृह) यांचेकडे बैठक झाली होती. तथापि, सदर बैठकीमध्ये दौंड तालुक्यातील चिबड खारवट शेत जमीन निर्मूलनाबाबतच्या विषयासंबंधी चर्चा झालेचे दिसून येत नाही.

दौंड तालुक्यातील एकूण १४ चर योजनांचे सर्वेक्षण पूर्ण झालेले असून क्षेत्रिय स्तरावर अंदाजपत्रके तयार करुन दिनांक १६ मे, २०२५ रोजी सादर केली आहेत. परंतु, मापदंड मंजूरी अभावी पुढील कार्यवाही करता येणे शक्य होत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २०/०९/१९९१ नुसार खुल्या चर योजनांचे मापदंड निश्चित करण्यात आलेले आहेत. सन २०१२-१३ पर्यंत त्या त्यावर्षीच्या CSR नुसार काही अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्यात

आली आहे.

तथापि, सन २०१५ पासून सुधारीत मापदंड निश्चिती अभावी नवीन चर योजनांना प्रशासकीय मान्यता देता येत नाही.

(४) होय हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) बंदिस्त व उघडया पाझरचर योजनांसंदर्भात मापदंड निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत

**(१४) १०८७७ (१९-०८-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीपैकी भावे समितीचा अहवाल सादर करण्यात आला असून, सुर्वे समितीचा अहवाल अद्याप सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्री यांचे समवेत दिनांक २३ मार्च, २०२५ रोजी व जलसंपदा मंत्री यांचे समवेत दिनांक १० मार्च व २३ मे, २०२५ या दिवशी बैठका पार पडल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामध्ये १० TMC पाणी वळविणेबाबत व त्यासाठी उपलब्ध पर्यायांवर चर्चा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त पाणी पूर्वमुखी वळविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४/०३/२०२५ रोजी मुळशी व कोयना प्रकल्प तसेच नद्यांच्या प्रवाह सुर्वे समितीच्या अहवालावर चर्चा करणेचे अनुषंगाने आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीतील निर्देशांच्या अनुषंगाने मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१/०५/२०२५ रोजी टाटा पॉवर, महापारेषण व महाजेनको व्यवस्थापनासोबत आढावा बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार टाटा पावर यांनी उक्त पाणी जलसंपदा विभागास उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने पर्याय तपासणेबाबत निर्देश देण्यात आले.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतर करण्याबाबत

**(१५) १०८७८ (३०-०७-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे व अस्तरीकरण करणेच्या कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास कृष्णा खोरे नियामक मंडळाची मान्यता दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना (ता. दौड, जि. बारामती) आणि पुरंदर (जि.पुणे) च्या धर्तीवर नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा क्षेत्रातील 'जाम प्रकल्प' व 'चिखली प्रकल्प' योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रुपांतर करण्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी (काटोल) मा.मुख्यमंत्री, यांना दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास मंत्रिमंडळ मान्यता देखील मिळाली असून, निविदा ३० जून पर्यंत प्रसिद्ध करण्यात येईल असे आश्वासन विभागाकडून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निविदा प्रकिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-११-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरण करणे व अस्तरीकरण करणेच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी केली होती.

त्यानुसार विस्तार व सुधारणा अंतर्गत जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरण करणे या कामास शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेतील प्रकल्पांतर्गत कालव्यावरील कामांस अंदाजित किंमत रू.४२९.८६ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी सदर कामाचा समावेश विशेष दुरूस्ती / विस्तार व सुधारणा कामाच्या प्राधान्यक्रमाच्या यादीत करण्यास दिनांक २४ सप्टेंबर,२०२४ रोजीच्या पत्रान्वये नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि सदर मान्यता ही सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता नसून प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता आहे.

(३) होय हे खरे आहे.

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली आहे.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ११ फेब्रुवारी,२०२५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेस रु.४३८.४८ कोटी रकमेच्या खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरण करणे या कामाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र मंडळ, नाशिक यांचेकडे

मुल्यार्पण करणेकरिता पाठविण्यात आले आहे. संकल्पन मंजुरीनंतर निविदा कार्यवाही करण्यात येईल.

तथापि नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा क्षेत्रातील जाम व चिखली या दोन प्रकल्पांच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणेच्या कामास मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त नसून त्याबाबतच्या निविदा प्रसिद्धीबाबत कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

(५) जाम मध्यम प्रकल्पांची दुरुस्ती व आधुनिकीकरण महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत निविदा कार्यवाही पूर्ण झाली असून त्याद्वारे सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होणार असल्याने जाम प्रकल्पांच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे संयुक्तिक राहणार नाही.

तसेच जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१७ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार पारंपारिक वितरण प्रणाली गृहीत धरुन भूसंपादन झालेल्या ठिकाणी नलिका वितरणाचा विचार करु नये असे नमूद आहे.

त्यानुसार चिखली प्रकल्पाच्या बाबतीत सद्य:स्थितीत बंदिस्त नलिका वितरण प्रणालीबाबत प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करणे शक्य नाही. तथापि, जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ अन्वये याबाबत समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार भविष्यात याबाबत निश्चित होणाऱ्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅक वॉटर क्षेत्रात बॅरेजेस बांधण्याबाबत

**(१६) १०८८० (१९-०८-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांतील मोठ्या प्रमाणावर शेती ही उजनी धरणाच्या बॅक वॉटरवर (फुगवटा क्षेत्र) अवलंबून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी उन्हाळयाच्या कालावधीत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर दुष्काळास सामोरे जावे लागत असल्याने या भागात बॅरेजेस बांधण्याची विनंती येथील शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तत्कालीन जलसंपदा मंत्री व मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ रोजी व जलसंपदा मंत्री यांनी दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत सुधारित धोरण ठरविणेबाबत आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बॅरेजेस बांधणेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी संचालक यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-११-२०२५) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २२/०१/२०२५ अन्वये पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता बुडीत बंधाऱ्यांची / बंधाऱ्यांची श्रृंखला इत्यादी पर्याय सूचविणे व बांधकामे हाती घेण्याकरिता शासन स्तरावरुन समिती स्थापन झाली असून कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) प्रस्तावित खानोटा उच्च पातळी बंधाऱ्याचे अनुषंगाने प्रस्ताव शासन स्तरावर तपासणीतंर्गत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील महावितरणचे वैराग विभागीय कार्यालय मंजूर करण्याबाबत

**(१७) १०९०० (०७-०८-२०२५). श्री.दिलीप सोपल (बार्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील महावितरणचे वैराग विभागीय कार्यालय शासन स्तरावर प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वतंत्र तालुका निर्मितीसाठी प्रतीक्षेत असलेल्या वैराग भागाला महावितरणचे विभागीय कार्यालय मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) बारामती परिमंडळ कार्यालयाकडून महावितरणचे वैराग विभागीय कार्यालय निर्माण करण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला नसून, बार्शी ग्रामीण उपविभागाचे विभाजन करून नव्याने वैराग उपविभागीय कार्यालय निर्माण करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(२) महावितरण कंपनीच्या दिनांक ०४.११.२०१० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये ग्राहक मानंके प्रसृत केलेली आहेत. सदर ग्राहक मानकानुसार ग्रामीण उपविभागीय कार्यालय विभाजनाकरीता ६०,००० किंवा त्यापेक्षा जास्त ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. त्यानुसार नव्याने निर्माण कराव्या लागणाऱ्या उपविभागीय कार्यालयासाठी वीज ग्राहकांची संख्या ३०,००० इतकी असणे आवश्यक आहे.

बार्शी ग्रामीण उपविभागाची सध्याची ग्राहक संख्या ७३,५८१ इतकी आहे. बार्शी ग्रामीण उपविभागाचे विभाजन करून नव्याने वैराग उपविभागीय कार्यालय निर्माण करावयाचे झाल्यास प्रस्तावित वैराग उपविभागात ३४,२४७ इतकी ग्राहक संख्या, तर बार्शी ग्रामीण उपविभागात ३९,३३४ इतकी ग्राहक संख्या राहणार आहे. विद्यमान बार्शी ग्रामीण उपविभाग कार्यालय हे ग्राहक मानकांचा निकष पूर्ण करीत असल्याने सद्यस्थितीत बार्शी ग्रामीण उपविभागीय कार्यालय हे विभाजनक्षम आहे.

सदर प्रस्तावासंदर्भात महावितरण कंपनीने प्रसृत केलेल्या ग्राहक मानकांचा निकष व कंपनीच्या आर्थिक दायित्वाचा विचार करुन महावितरण कंपनीकडून धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूर महाऔष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(१८) १०९३६ (१९-०९-२०२५). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूर महाऔष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरी देण्याच्या नावाने गेल्या १० ते १५ वर्षापासून केवळ प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्यांना वेतन व अन्य सुविधांपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांच्या वारसांचे गेल्या अनेक वर्षापासून ऑडिट करण्यात आलेले नसून त्यांना

वेतना ऐवजी आजही मानधन (प्रशिक्षणार्थी वेतन) देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरीत सामावून घेऊन त्यांना शासनाच्या नियमान्वये वेतन व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२६) :** (१) महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांना विविध पदांवर नियमित रोजगार/ नोकरी मिळविता यावी, यास्तव प्रगत कुशल प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत असते. त्यानुसार महानिर्मितीकंपनीचे पात्र प्रकल्पगस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षणावर रुजू झाल्यानंतर त्यांना प्रशिक्षणाच्या कालावधीत प्रतिमहा रु.१४ हजार ते १६ हजार विद्यावेतन अदा करण्यात येते. महानिर्मिती कंपनीने उमेदवारांच्या प्रतिमाह विद्यावेतनात रु. २००० ते रु.५००० पर्यंत वाढ केली आहे. वेतन व अन्य सुविधा या महानिर्मिती कंपनीच्या नियमित सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांसाठीच देय आहेत.
(२) कागदपत्र पडताळणीअंती वैध अहवाल प्राप्त झाल्यानंतरच प्रकल्पग्रस्त उमेदवार अथवा मुळ प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या कुटुंबातील पात्र व्यक्तीस उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर सदरील पात्र उमेदवारांस प्रगत कुशल प्रशिक्षणावर रुजू करुन घेण्यात येते व सदर उमेदवारास विद्यावेतन देण्यात येते.
(३) प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याबाबतच्या प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथील याचिका क्र. ७४७२/२००७ प्रकरणी दिनांक ३१.०३.२००८ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६- अ, दिनांक २७.१०.२००९ नुसार गट - क व गट-ड पदाकरीता प्रकल्पग्रस्त उमेदवारांची नियुक्ती पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्याबाबत निर्देशित केले आहे. त्यानुसार महानिर्मिती कंपनीमार्फत कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे)विभागात अनुज्ञप्ती राज्य उत्पादन शुल्क विभाग उल्हासनगर विभागाच्या कार्यक्षत्रेत्रातच ठेवण्याबाबत

**(१९) १०९४५ (१८-०८-२०२५). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सुधारित आकृती बांधाची पुनर्रचना गृह विभाग शासन निर्णय क्र इएस टी १६१६/प्र.क्र २००/रा उशु दिनांक १८/६/२०२४ नुसार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील कार्यक्षेत्र वाटपामुळे उल्हासनगर मधील परवानाधारक आणि सामान्य नागरिक व माजी सैनिक याना राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित कामा करिता कल्याण किंवा भिवंडी विभागाकडे जावे लागत असल्याने उल्हासनगर मधील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर मधील काही भाग भिवंडी तसेच कल्याण या ठिकाणीही गेल्याने अनुज्ञप्ती ची मंजूर जागा उल्हासनगर महागरपालिकेत असल्याने महानगपालिकेची मालमत्ता कराची पावती देखील महानगरपालिका प्रदान करीत असून अनुज्ञप्ती नूतनीकरण शुल्क महानगरपालिकेच्या संरचनेनुसार भरण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनुज्ञापती धारकांना व नागरीक माजी सैनिक याना शासकीय कामकाजासाठी भिवंडी - कल्याण

विभागात जावे लागणार नाही त्यांना व्यवहार करणे देखील उल्हासनगर विभागामध्ये सोईचे आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उल्हासनगर विभागात अनुज्ञप्ती राज्य उत्पादन शुल्क विभाग उल्हासनगर विभागाच्या कार्यक्षेत्रात ठेवण्याची मागणी येथील लोकप्रतिनिधी यांनी राज्य सरकारकडे आणि आयुक्त राज्य उत्पादन विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे,

**श्री. अजित पवार (०३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ते (६) शासन निर्णय दिनांक १८ जून, २०२४ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आकृतीबंधाच्या मर्यादेत सुधारित पुनर्रचनेनुसार कार्यकारी घटकांची कार्यक्षेत्रे निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये जिल्ह्यांचा भौगोलिक विस्तार, अनुज्ञप्तीची संख्या, जमा महसूल, पोलीस स्टेशन हद्द इ.बाबी विचारात घेऊन कार्यकारी घटकाचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले आहे.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील सेंट्रल पोलीस स्टेशन व टिटवाळा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्राचा समावेश अनुक्रमे निरीक्षक,राउशु,कल्याण व भिवंडी यांच्या कार्यकारी घटकामध्ये करण्यात आलेला होता.

तथापि, अंमलबजावणीच्या सोईच्या दृष्टीने दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निरीक्षक,राउशु उल्हासनगर यांच्या कार्यक्षेत्रात सेंट्रल पोलीस स्टेशन व टिटवाळा पोलीस स्टेशन कार्यक्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांना निरीक्षक,कल्याण व निरीक्षक,भिवंडी यांच्याकडे जावे लागणार नाही.

---

## देशातील पहिला "स्टार रेटिंग प्रोग्राम" बंद करण्यात आल्याबाबत

**(२०) १०९६४ (०९-१०-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पहिला स्टार रेटिंग प्रोग्राम एस.आर.पी. हा दिनांक ५ जून, २०१७ रोजी पासून सुरु करण्यात आला असून सन २०२४ मध्ये बंद करण्यात आला व त्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेही मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक संस्था आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने पथदर्शी असणारा स्टार रेटिंग प्रोग्राम या प्रकल्पात राज्यातील ३३ जिल्ह्यांमधील ४११ उद्योगांचा समावेश करून त्यांना त्यांच्या वायु उत्सर्जनाच्या आधारे एक ते पाच स्टारपर्यंत गुणांकन दिले जाणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाद्वारे मिळणारी माहिती जनतेसाठी ऑनलाइन उपलब्ध करून दिली जात असून त्यात हवेच्या दर्जाबाबत जागरूकता वाढविण्यासह प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांना प्रदूषण कमी करण्यासाठी प्रोत्साहित करता येत होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाद्वारे निवडलेल्या ४८ कंपन्या रायगड जिल्ह्यातील असून पुणे जिल्ह्यातील २४, ठाणे २६, सातारा १७, सोलापूर १६, आणि मराठवाड्यातील ४३ कंपन्यांची निवड करण्यात आली असून १८ जिल्ह्यात सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या कंपन्या असल्याचे या गुणांकनामधून समोर आले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन सदर "स्टार रेटिंग प्रोग्राम" सुरू करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सदर प्रकल्पाच्या परिणामकारकतेचा अभ्यास J-PAL South Asia, EPIC आणि हॉवर्ड विद्यापीठ या संशोधन संस्थांमार्फ़त करण्यात आलेला आहे. कार्यक्रमाच्या संकारात्मक प्रभावाची नोंद नीती आयोगासह अनेक राष्ट्रीय मंचावर घेण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळातंर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध नागरिकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२१) १०९८० (२०-०७-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध नागरिकांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या हेतूने सदर महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जात असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासन व केंद्र शासनामार्फत सदर महामंडळास निधी प्राप्त होत असून सर्व जिल्ह्यात जिल्हा कार्यालय व विभागीय स्तरावर प्रादेशिक कार्यालय कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक वर्षांपासून सदर महामंडळाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून निधी अभावी व अध्यक्षांविना सदर महामंडळ सुरू असून, निधी उपलब्धते अभावी सर्व योजना ठप्प असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त महामंडळाला निधी उपलब्ध व अध्यक्षांची नियुक्ती करून सर्व योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२६-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ३६ जिल्ह्यात जिल्हा कार्यालय व ६ विभागीय स्तरावर प्रादेशिक कार्यालये कार्यरत आहेत.
(३) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राज्य शासनाच्या योजनेंतर्गत भाग भांडवल योजना, PMAJAY (विशेष केंद्रीय अर्थसहाय्य), तसेच राष्ट्रीय महामंडळाच्या एनएसएफडीसी व एनएसकेएफडीसी अर्थ सहाय्यीत विविध योजना सध्य:स्थितीत सुरू आहेत. सबब महामंडळाच्या सर्व योजना ठप्प असल्याचे खरे नाही.
(४) महामंडळावर अध्यक्षांची नेमणूक करण्याबाबत नियमानुसार योग्य कार्यवाही करण्यात येईल.
महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या राज्य शासन व केंद्र शासनाच्या सर्व योजना सुरळीत चालु आहेत. तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी निधी प्राप्त झाल्यानुसार लाभार्थ्यांचे कर्ज प्रकरणे मंजूर व वितरित करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे गायगव्हाण (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील तलाव क्र.२ मधील गाळ काढणेबाबत**

**(२२) १०९८४ (१९-०९-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गायगव्हाण (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील गायगव्हाण तलाव क्र. २ या तलावातील संपादीत केलेल्या क्षेत्रातील संपूर्ण गाळ काढून तलावाचे खोलीकरण, रूंदीकरण व मजबुतीकरण करणे हे अत्यंत आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावातील गाळ काढल्याने पाणी साठवण क्षमतेत दुप्पट वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर तलावातील गाळ काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (११-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सद्यस्थितीत तलावामध्ये पाणी असल्याने गाळाची मोजमापे घेऊन परिमाण निश्चित करता येत नाही. तथापि, गाळ काढण्यात येणा-या परिमाणाएवढी पाणी साठवण क्षमतेत वाढ होईल.

(३) तलावातील पाणी आटल्यानंतर गाळाची मोजमापे घेऊन अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भात विशेषत: गोंदिया,भंडारा व गडचिरोली जिल्हयातील सहकारी संस्थांना सामाजिक न्याय विभागाच्या अनुदान योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(२३) १०९९३ (२०-०७-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाद्वारे औद्योगिक सहकारी संस्थांना आर्थिक अनुदान देण्याची योजना मागील ३५ वर्षांपासून अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जातीच्या मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांना अनुदान देताना मागील ३५ वर्षांत फक्त मराठवाडा, कोल्हापूर, सातारा व सांगली या भागातील ९० टक्के संस्था या योजनेत समाविष्ट असून त्यामध्ये विदर्भातील विशेषत: गोंदिया, गडचिरोली व भंडारा या जिल्हयातील संस्थांना डावलण्यात आले असून यापूर्वी देखील सन २०२२- २०२३ ते २०२४ ते २०२५ या कालावधीत सुध्दा जिल्हयातील एकही संस्थेचा यात समावेश करण्यात आला नसल्याचे सन २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेत लाभार्थी निवडताना प्रादेशिक समतोल व जिल्हयाचा समतोल राखणे आवश्यक असून त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा व गोंदिया, भंडारा, गडचिरोली या जिल्हयांचा समावेश करण्यांत यावा अशा मागणीबाबत मा.मंत्री महोदयांना लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (१०-१२-२०२५) :** (१) "अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची योजना" सन २००४ मध्ये सुरु करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही. सदर योजनेंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात २ व भंडारा जिल्ह्यात ४ अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे. सदर योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्यातून प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.
(३) हे खरे आहे.
(४) शासन स्तरावर मंजूरीसाठी अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रलंबित असलेल्या ४४९ प्रस्तावामध्ये भंडारा, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यातील एकाही संस्थेचा प्रस्ताव प्राप्त नाही. सबब, सदर जिल्ह्यातील संस्था मंजूर होत नसल्याची तसेच सदर योजनेत लाभार्थी निवडताना प्रादेशिक समतोल, जिल्ह्याचा समतोल राखला जात नसल्याची बाब खरी नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या ई-कचरा संकलन उपक्रमाबाबत**

**(२४) ११०१२ (१६-०७-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक कचरा (ई-कचरा) संकलन सेवा दिनांक ५ मे २०२५ पासून सुरू करण्यात आली, या अंतर्गत घरगुती ई-कचऱ्यासाठी नागरिकांकडून नोंदणी घेण्यात येत असून या सेवेसाठी आतापर्यंत किती नोंदणीकृत संस्थाची निवड करण्यात येऊन या कचऱ्याचे वर्गीकरण, संकलन व वैज्ञानिक पद्धतीने निवारण कशा प्रकारे केले जात आहे याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रशासन कमी पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास ई-कचऱ्यामध्ये असलेल्या मर्क्युरी, लेड, कॅडमियम यांसारख्या धोकादायक रसायनांमुळे पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यास हानी पोहचत असल्याने मुंबई महानगरपालिकेने ई-कचऱ्याच्या सुरक्षित हाताळणीसाठी कोणते उपाय, करार किंवा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत,
(३) असल्यास, मुंबईतील प्रत्येक प्रभागात ई-कचरा संकलनासाठी स्वतंत्र वेळापत्रक व वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे काय, व नागरिकांना वेळेवर सेवा मिळत असल्याची खात्री कशा पद्धतीने केली जात तसेच ही सेवा खाजगी कंत्राटदारामार्फत चालवली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ई-कचरा संकलन व पुनर्वापरासंबंधी जनजागृतीसाठी विशेष मोहिमा राबविण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात येऊन अशा प्रकारे किती मोहिमा राबविण्यात येऊन नागरिकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या माध्यमातून किती ई-कचरा संकलित करण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) दिनांक ५ मे, २०२५ पासून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची मान्यता प्राप्त असलेले मेसर्स इलेक्ट्रोफाइन रिसायकलिंग प्रायव्हेट लिमिटेड यांची सर्व २५ वार्ड मधून ई-कचरा गोळा करणे. वाहतूक करणे

आणि विल्हेवाट लावणे यासाठी १ वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर नियुक्ती करण्यात आली आहे.

महापालिकेचे अधिकृत संकेतस्थळ, समाजमाध्यमे इ. नागरिकांच्या सोयीसाठी ई कचरा संकलनासाठी स्वतंत्र लिंक उपलब्ध करून दिली आहे. त्यावरील क्यूआर कोड स्कॅन करून याद्वारे या सुविधेसाठी नागरिकांना नोंदणी करता येते.

कंत्राटदारामार्फत सातारा येथील प्लांटवर वैज्ञानिक पद्धतीने ईवेस्ट नूतनीकरण, पुनर्वापर आणि शुद्धीकरण क्षमता वापरून सदर उपक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील क्षेत्रात गोळा करून, वाहून नेण्यात येणाऱ्या कचऱ्याची सुरक्षित हाताळणी करण्यात येते.

महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ, समाज माध्यमे, कर्मचारी वर्ग व तसेच मेसर्स इलेक्ट्रोफाइन यांच्याकडून विभाग स्तरावर बॅनर्स, पोस्टर्स पॅम्प्लेट याद्वारे जनजागृती करणे व संकलनासाठी मनुष्यबळ व वाहन सेवा पुरविण्यात येते. सर्व विभाग स्तरांवर निर्माण होणारा ओला कचरा गोळा करण्यासाठी एकूण ६५० कॉम्पॅक्टर वाहनांना ई-वेस्ट गोळा करण्यासाठी स्वतंत्र कप्पा देण्यात आलेला आहे.

नियोजित वेळेत दैनंदिन प्राप्त झालेला ई-कचरा त्या त्या विभाग स्तरावरील सुका कचरा वर्गीकरण केंद्रे (एकूण ४६) यांच्याकडे पुढील विल्हेवाटीसाठी सोपविण्यात येते. सदर सेवेदाराची नियुक्ती झाल्यापासून उप आयुक्त (घ.क.व्य.) यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात येते.

आतापर्यंत सर्व विभाग स्तरावर एकूण ३० पेक्षा जास्त मोहिमा जनजागृतीसाठी राबविल्या गेल्या आहेत. आत्तापर्यंत सात टन ई-कचरा विल्हेवाटीसाठी संकलन करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शून्य शिक्षकी शाळांची स्थिती आणि त्यावरील शासनाची उपाययोजना

**(२५) ११०१९ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शून्य शिक्षकी शाळा असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शून्य शिक्षकी शाळांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा परिस्थितीवर उपाययोजना म्हणून शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी किंवा संचमान्यतेतील विद्यार्थी संख्येचे निकष बदलण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कांदिवली पूर्व येथे स्व. मनोहर पर्रीकर मैदानात भूमिगत वाहनतळ उभारण्यात येणार असल्याबाबत

**(२६) ११०६९ (०८-०९-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पूर्व येथे स्व. मनोहर पर्रीकर मैदानात भूमिगत वाहनतळ उभारण्यात येणार असून वाहनतळ उभारण्यात अद्याप पर्यन्त कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, भूमिगत वाहनतळाच्या कामास विलंब होण्याची नेमकी काय कारणे आहेत, वाहनतळाचे काम कधीपर्यन्त पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीकतून भूमिगत वाहनतळाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानरगपालिकेच्या आर/दक्षिण विभागा अंतर्गत येणारा कांदिवली पूर्व येथील स्व. मनोहर पर्रीकर मैदान, न. भू. क्र.१७१/१ए/४१, आकूर्ली गाव, कांदिवली (पूर्व) हा ३६०१.८ चौ.मी. भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात असून खेळाच्या मैदानाकरिता राखीव आहे. सदर भूखंडावर भूमिगत वाहनतळ उभारण्याकरीता प्रकल्प महानगरपालिकेव्दारे हाती घेण्यात आला असुन या प्रस्तावित वाहनतळामध्ये पार्कींग व्यवस्था ३८९ कार आणि २१ दुचाकींचा समावेश असून सदर प्रस्तावाकरीता पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत ना-हरकत संजय गाधी राष्ट्रीय उद्यान यांचे कडुन प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालापूर (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील गुळ मध्यम प्रकल्पाच्या धरण गळतीच्या दुरुस्तीबाबत

**(२७) ११११०० (१९-०८-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालापूर (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील गुळ मध्यम सिंचन प्रकल्प हा आदिवासी भागातील एकमेव प्रकल्प असून प्रकल्पाच्या २६८ मी. ते २६८.४५ मी. या पूर्ण संचय पातळी पर्यंत सद्य:स्थितीत जलसाठा करता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या २६८ मीटर पातळी पर्यंत पाणी पातळी आल्यावर माती धरणाच्या सुमारे १०० मी. लांबीच्या भागात नितळ पाणी वाहण्यास सुरुवात होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धरणाच्या खालील बाजूस मालापूर हे गाव असल्यामुळे सदर गावास व प्रकल्पाच्या माती धरणास हानी पोहचू नये याकरिता धरणाच्या आतील बाजूस जलरोधन आवरण (ब्लँकेट) यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपाययोजना करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

गुळ धरणाच्या घळ भागात सा.क्र.६२० मी. ते ६७० मी. या ५० मी. लांबीमध्ये धरणाचा तलांक २६७.८०० मी. च्या वर पाणीपातळी गेल्यावर पाण्याची गळती होत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर गळतीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी व गळतीचे कारण जाणून घेण्यासाठी विभागामार्फत घळभागाचे Geophysical Investigation व Tomography सर्वेक्षण करण्यात आले आहे.

सदर सर्वेक्षणाच्या अभिकरणाकडुन प्राप्त अहवालात Grouting सुचविण्यात आले आहे. त्यानुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे सल्ल्याने उपाय-योजना प्रस्तावित करण्यात येत आहेत.

सदर काम धरण सुरक्षा अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सदरचे गळतीच्या दुरुस्ती चे काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) १११०२ (१९-०९-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील नागरीकांना आरोग्य सेवा पुरविणा-या १५ ग्रामीण रुग्णालय व ७८ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, औषध निर्माता, आरोग्य सहाय्यक, तंत्रज्ञ यासह आरोग्य सेवकांची पदे गेल्या वर्षभरापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य मिशन अभियानांतर्गत (एनएमएच) १३० कंत्राटी कर्मचा-यांची भरती प्रक्रिया माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये राबविण्यात आलेली असून सदर भरती ही समांतर आरक्षणाच्या बिंदू नामावलीत अडकल्याने गेल्या पाच महिन्यापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त असलेली पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१२-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दिनांक ०१.०९.२०२४ रोजी ६७ रिक्त पदाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. यासाठी बिंदुनामावली दिनाक २९.७.२०२४ रोजी प्राप्त होती. यामध्ये समांतर आरक्षण लागू होते तसेच दिनांक ११.१०.२०२४ रोजी ७७ रिक्त पदांची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. यासाठी बिंदुनामावली दिनांक १३.८.२०२४ रोजी प्राप्त झालेली होती. ही भरती प्रक्रिया दिनांक १३.०३.२०२५ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

सदर जाहीरातीमधील रिक्त पदे शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे मंजुरीने भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२४ मधील कोणतीही भरती प्रक्रिया प्रलबित नाही.

जळगाव अधिनस्त ग्रामीण रुग्णालये, प्रा.आ. केंद्रांमधील वैद्यकिय अधिकारी, परीचारीका, औषध निर्माता, आरोग्य सहाय्यक, तंत्रज्ञ पदे रिक्त असली तरी बंधपत्राद्वारे कंत्राटी पाध्दतीने तसेच तंत्रज्ञ व वर्ग ४ कर्मचारी याची पदे तात्पुरत्या स्वरुपात बाह्यस्त्रोताद्वारे नेमणूका देण्यात येऊन नियमित रुग्णालयीन कामकाज तसेच रुग्णाना रुग्ण सेवा योग्यरित्या देण्यात येत आहे.

राज्यातील वैद्यकीय अधिकारी (एस-२०) संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील आदिवासी योजनांबाबत

**(२९) १११६२ (०८-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना-सुविधा व आदिवासी समुदायांचे कल्याण सुधारण्यासाठी आरोग्य-पोषण कार्यक्रम आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समुदायांना निर्णय प्रक्रियेत आणि विकास कार्यात सहभागी करून घेण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी विभागाकडून उपक्रमही घेतले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे जिल्ह्यातील पेसा अंतर्गत ग्रामपंचायत येथे योजना सुरु असल्यास त्याबाबत तपशील देण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे जिल्ह्यातील आदिवासी योजनांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२३-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पुणे जिल्ह्यातील जुन्नर व आंबेगांव या दोन गटातील ८४ ग्रामपंचायतींचा अनुसूचित क्षेत्रात समावेश आहे. अनुसूचित क्षेत्रातील या ग्रामपंचायतींकरिता आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी उपयोजनेंतर्गत ५% “थेट निधी योजना” सन २०१५-१६ पासून राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी दरवर्षी सर्वसाधारणपणे पुणे जिल्ह्याकरिता ४ कोटी ८५ लाख ११ हजार इतका निधी प्राप्त होतो. प्राप्त होणाऱ्या निधीमधून प्रत्येक ग्रामपंचायत, पेसा गावातील ग्रामसभा कोष समिती मार्फत, ग्रामसभेच्या मान्यतेने दरवर्षी प्राप्त होणाऱ्या निधीमधून खालील बाबींवर कामे घेण्यात येतात:-

(अ) पायाभूत सुविधा

(ब) वनहक्क कायदा (FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी

(क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण व

(ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका या बाबींवर शक्यतो १/४ या प्रमाणात निधी विनियोगात आणला जातो.

त्यानुसार ग्रामपंचायतीला प्राप्त होणाऱ्या निधीतून “क” (आरोग्य, स्वच्छता, शिक्षण) या बाबींतर्गत सर्वसाधारणपणे

१) सार्वजनिक स्वच्छता राखणे, सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे किंवा बांधणे,

२) गावामध्ये स्वच्छता राखणे,

३) सांडपाणी व्यवस्थापन करणे.

४) घनकचरा व्यवस्थापन, कंपोस्ट खताचे खड्डे

५) अंतर्गत गटर दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम करणे.

६) शुध्द पिण्याचे पाणी पुरविणे.

७) गावातील शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता सुधारणेसाठी उपाययोजना करणे.

८) ई लर्निंग सुविधा पुरविणे.
९) आरोग्याच्या सोयी-सुविधा पुरविणे.

इत्यादी बाबींवर वार्षिक प्राप्त निधीतून ग्रामसभेला ग्रामसभा कोष समिती मार्फत खर्च करता येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाकण व खेड तालुक्यातील आशा कार्यकर्त्यांबाबत**

**(३०) १११६७ (०८-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण नगरपरिषद हद्दीतील आशा कार्यकर्त्या यांची सेवा अन्यत्र वळविण्यात आल्या असल्याने शहरातील आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यासाठी कोणीही आशा कार्यकर्त्या उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, खेड तालुक्यामध्ये माता आणि बाल आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी, आरोग्य सेवांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी आणि ग्रामीण समुदायांना आरोग्य शिक्षण सह जागृता देण्यासाठी मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ते (ASHAs) कोणत्या विशिष्ट जबाबदाऱ्या आणि उपक्रम राबवतात तसेच, त्यांचे प्रयत्न आरोग्यसेवेतील असमानता कमी करण्यासाठी कसे योगदान देतात याचा तपशील काय आहे,

(३) तसेच, खेड तालुक्यातील शहरी, संक्रमणात्मक नागरी क्षेत्र व ग्रामीण भाग अनुषंगाने अधिकच्या आशा कार्यकर्त्या सेवेत घेता येईल काय?

**श्री. प्रकाश आबिटकर (०४-१२-२०२५) :**(१) चाकण नगरपरिषदमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेविकांची पदे मंजूर नसल्याने त्यांचे पद अन्यत्र वळविण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

(२) खेड तालुक्यामध्ये आशा स्वयंसेविका जनतेला विविध प्रकारच्या आरोग्य सेवा माता व बाल लसीकरण, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, जननी सुरक्षा योजना, क्षयरोग कुष्ठरोग, साथीचे आजार अशा विविध केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आरोग्य विषयक सेवा देतात. आशा स्वयंसेविका ग्रामीण भागातील सर्व जनजाती समुदायाला आरोग्य सेवा देवून आरोग्य विषयक असमानता कमी करण्याचा प्रयत्न करतात.

(३) खेड तालुक्यातील शहरी भागासाठी व ग्रामीण भागासाठी अधिकच्या आशा सेविकांची मागणी क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात आली आहे. याबाबत दिनांक १९.०५.२०२५ रोजी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

---

**वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी सातबारा कोरा करण्याच्या मागणीबाबत**

**(३१) ११२१७ (१९-०८-२०२५). श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कर्जमाफी, सातबारा कोरा करण्याची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी प्रधान म्हणून देशाची ओळख असतानाही अन्नधान्य उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या तात्काळ सोडवून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील (२४-०९-२०२५) :** (१) होय,

किसान ब्रिगेड, महाराष्ट्र या संघटनेशी संबंधित शेतकऱ्यांनी माहे मे, २०२५ मध्ये कर्जमाफी देण्यासंदर्भात निवेदन सादर केली आहेत.

(२) शासनाकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०१९ व महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना या तीन योजना राबविल्या आहेत. कर्जमुक्ती योजने अंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी घेतलेल्या कर्जापोटी अनुक्रमे रु. १.५ लाख व रु. २.०० लाख पर्यंतच्या थकित रकमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच प्रोत्साहन लाभ योजनेअंतर्गत रु. २५,००० व रु. ५०,००० पर्यंतचा लाभ पात्र शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. सदर योजनांतर्गत आतापर्यंत अनुक्रमे रु.१८,७६२ कोटी, रु. २०,४९७.१३ कोटी व रु.५२१६.७५ कोटी रकमेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अतिभारीत अति उच्चदाब उपकेंद्र क्षमता वाढविण्याबाबत

**(३२) ११२२४ (१९-०९-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अतिभारीत अतिउच्चदाब उपकेंद्र क्षमता वाढविण्याची तसेच प्रलंबित उपकेंद्राची क्षमता, अतिरिक्त रोहित्रे वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी निवेदनान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांना दिनांक ३ मार्च, २०२५ व ६ मार्च, २०२५ रोजी पत्र पाठवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी महापारेषण कंपनीस पत्र पाठविलेले आहे.

(३) मा. श्री. राहुल कुल, वि.स.स. यांनी त्यांच्या पत्रात एकूण ५ मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्यांबाबतची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

१. सद्यस्थितीत १३२/३३/२२ के.व्ही. यवत उपकेंद्राची एकूण स्थापित क्षमता २२५ एम.व्ही.ए. असून उक्त उपकेंद्रावर सर्व साधारण १२५ एम.व्ही.ए. इतके वीज भार आहे. त्यामुळे १०० एम.व्ही.ए. इतके वीज भार पूरण्याची क्षमता शिल्लक आहे. भविष्यात या उपकेंद्रावर मागणी वाढल्यास सदर उपकेंद्रातील रोहीत्रांचा क्षमतावर्धनासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल. तसेच २X१५=३० एमव्हीएआर, १३२ के.व्ही. व २x१० एमव्हीएआर, ३३ के.व्ही. आणि २x५ एमव्हीआर, २२ के.व्ही. साठी कॅपॅसिटर बँक मंजूर असून सदर कामे प्रगती पथावर आहेत.

२. १३२ के.व्ही. अति उच्चदाब राहू पाटेठाण वीज उपकेंद्राची उभारणी करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या बारामती परिमंडळातर्फे तयार करण्यात आला असून सदर प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी महापारेषण कंपनीकडे पाठविण्यात येईल.

३. सद्यस्थितीत १३२ के.व्ही. जनाई उपकेंद्रात १३२/३३ के.व्ही. २५ एमव्हीए क्षमतेचा अतिरिक्त रोहित्राचा प्रस्ताव मंजूर असून निविदा प्रक्रिया चालू आहे. तसेच, २x१०= २० एमव्हीएआर ३३ के.व्ही. क्षमतेची कपॅसिटर बँक मंजूर असून काम प्रगती पथावर आहे. यामुळे १३२/३३ के.व्ही. जनाई उपकेंद्राची क्षमता ५० वरुन ७५ एम.व्ही.ए. होणार आहे. सदर उपकेंद्रातील क्षमतावाढ योजनेची निविदा प्रक्रिया सुरु असून पुढील एक वर्षात क्षमता वाढ होणे अपेक्षित आहे.

४. १३२/३३ के.व्ही. जनाई अति उच्चदाब वीज उपकेंद्रामध्ये अतिरिक्त २५ एम.व्ही.ए. क्षमतेच्या रोहित्राच्या उभारणीचे काम झाल्यानंतर त्याचा लाभ भांडगांव, देऊळगाव गाडा, पडवी, कुशेगांव, चौफुला व वरवंड या गावांना होणार आहे. त्यामुळे नवीन १३२ के.व्ही. भांडगाव अति उच्चदाब वीज उपकेंद्र तांत्रिक दृष्टया व्यवहार्य नाही. तसेच भांडगाव परिसरात नवीन उद्योग केंद्र विकसित होत असल्याने सदर ठिकाणी नवीन ३३/२२ के.व्ही. भांडगाव (२X१० MVA) वीज उपकेंद्र ADB या योजनेमध्ये प्रस्तावित केले आहे. यामुळे या ठिकाणी येणाऱ्या नवीन ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीतपणे केला जाऊ शकतो.

५. ३३ के.व्ही. चे नवीन बे तयार करण्यासाठीच्या प्राप्त प्रस्तावानुसार सदर काम निविदा प्रक्रियाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळूरपीर (जि.वाशिम) येथे अवैध देशी व विदेशी दारू, चारकारी वाहन व इतर मुद्देमाल जप्त केल्याबाबत**

**(३३) ११२२९ (१९-०९-२०२५). श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळूरपीर (जि.वाशिम) येथे अवैध देशी व विदेशी दारू वाहतुकीवर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने दिनांक १७ मे, २०२५ रोजी कारवाई करुन दारूसाठा, चारचाकी वाहन व मोबाईलसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मंगरुळपीर जि. वाशिम येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५(ई) सह भारतीय न्याय संहिता कलम ३(५) अप क्र २९९/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मंगरुळपीर जि.वाशिम येथे अवैध देशी व विदेशी दारु वाहतुकीवर पोलीस पथकाने दिनांक १७.०५.२०२५ रोजी कारवाई करुन दारुसाठा, वाहन व मोबाईलसह एकुण १०,११,२२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एकूण २६ आरोपी निष्पन्न झाले आहेत. तसेच, जप्त केलेला देशी विदेशी दारुचा मुद्देमाल हा मंगरुळपीर येथील लुल्ला वाईन शॉप यांचे कडून आणल्याचे निर्दशनास आल्याने सदर वाईन शॉप वर कारवाई करुन त्यांचा परवाना रद्द करण्याकरिता दिनांक ३०.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजनेअंतर्गत अनेक लाभार्थींचे घरकुल अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३४) ११२३१ (२९-०९-२०२५). श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुलाच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील बांधकामे पूर्ण होऊनही वाशिम, रिसोड, मालेगाव तालुक्यातील अनेक लाभार्थींचे घरकुल अनुदान प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील अनुदान प्रलंबित असल्याने घरकुलधारकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुलांच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील बांधकामे पूर्ण झालेल्या नागरिकांना घरकुल धारकांना तात्काळ अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काटेपूर्णा आणि सोहळ (जि.वाशिम)काळवीट अभयारण्यासह प्रादेशिक वन विभागाच्या अक्षर येथील जंगलात विविध प्राण्यांना पुरेशा चाऱ्याची व पाण्याची सोय करण्याबाबत

**(३५) ११२३५ (२१-०७-२०२५). श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात जंगलात चारा व पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने काटेपूर्णा व सोहळ काळवीट अभयारण्यासह अन्य जंगलामधील वन्यप्राणी पाण्याच्या शोधात शेत शिवार व लोकवस्तीकडे धाव घेत असल्याने वन्यप्राण्यांना जीव गमवावा लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या प्रकरणी काटेपूर्णा आणि सोहळ काळवीट अभयारण्यासह प्रादेशिक वन विभागाच्या अक्षर येथील जंगल महत्त्वाचे असून या जंगलात बिबट, कोल्हा, हरिण, काळविट, नीलगाय, रानडुक्कर, माकड, साळींदर आदी विविध प्राण्यांची संख्या लक्षणीय असूनही त्यांना पुरेशा चारा व पाण्याची सोय करण्यासाठी वन विभागाने कोणती उपाययोजना केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गणेश नाईक (२५-११-२०२५) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) काटेपूर्णा व सोहळ काळवीट अभयारण्यात वन्यप्राण्यांसाठी मुबलक पाणीसाठी उपलब्ध होण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

नैसर्गिक पाणवठे-०९, कृत्रिम पाणवठे-३५, सोलर पंप-०४, सिमेंट बंधारे-२५, दगडी बांध-२७, माती बंधारे-१७, वनतळे-३० उपलब्ध आहेत.

• जंगलतोड व अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी क्षेत्रीय वनअधिकारी व वनकर्मचाऱ्यांना वेळोवेळी सूचीत

करण्यात येते.

• वरीष्ठ अधिकारी अभयारण्य क्षेत्रात नियमीत भेटी देत असतात.

• क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी जंगल व वन्यजीव संरक्षण, संवर्धनाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या जातात. अवैध जंगलतोडीबाबत गुन्हे रोखण्यासाठी अभयारण्यालगतचे गावांमध्ये प्रबोधन व जनजागृती करण्यात येते.

• जंगलतोड रोखण्यासाठी नियमीतपणे बिट निरीक्षण करण्यात येते.

• वनअधिकारी व वन कर्मचाऱ्यांद्वारे पायी तसेच वाहनांद्वारे नियमीत गस्त करण्यात येते.

• वन्यप्राणी अधिवास क्षेत्र समृध्द करणे व वन्यप्राण्यांना पुरेशा चाऱ्यांची सोय करण्याच्या अनुषंगाने दोन्ही अभयारण्यामध्ये अखाद्य वनस्पतींचे उच्चाटण करणे व कुरण विकासाची कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. इ.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"सर्वांसाठी घरे" या पंतप्रधान यांच्या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत सिडको कडून बांधण्यात येणाऱ्या घरांबाबत**

**(३६) ११२७७ (१८-०९-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "सर्वांसाठी घरे" या पंतप्रधान यांच्या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत सिडकोने सुमारे एक लाख घरे बांधण्याचे ठरविले असून त्यादृष्टीने सिडकोने नियोजन दिनांक ५ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचबरोबर सिडकोमार्फत यापूर्वीच २५ हजार घरांचे बांधकाम सुरु देखील करण्यांत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकामे सुरु असलेल्या घरांचे बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण करण्यांत येणार आहे तसेंच सिडकोच्या अर्थसंकल्पानुसार १ लाख घरे बांधकामाबाबत कोणते नियोजन करण्यात आले वा करण्यांत येत आहे,

(४) असल्यास, शासनाने चौकशी करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२५) :** (१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सिडकोने सप्टेंबर, २०१९ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिकांकरीता एकूण ८६९६१ घरांसाठी गृहनिर्माण प्रकल्प हाती घेण्यात आले असून चार पॅकेजमध्ये विभागण्यात आले आहेत.

(२) व (३) सदर प्रकल्पांतर्गत सुमारे ६७२३५ घरांचे काम प्रगतीपथावर आहे. पॅकेज १ अंतर्गत एकूण १४८३९ घरांचे बांधकाम सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण होत आहे. पॅकेज २ अंतर्गत एकूण ८५०६ घरांचे बांधकाम जानेवारी, २०२६ ते मार्च, २०२७ पर्यंत पूर्ण होत आहे. पॅकेज ३ अंतर्गत एकूण ६७५८ घरांचे बांधकाम डिसेंबर, २०२५ ते डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होणारे आहे व पॅकेज ४ अंतर्गत एकूण १८४०२ घरांचे बांधकाम फेब्रुवारी, २०२७ पर्यंत घरांचे बांधकाम पूर्ण होणार आहे. तसेच याव्यतिरीक्त नावडे (तळोजा) नोड येथे एकूण १८७३० आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असून सदरील बांधकाम नोव्हेंबर, २०२७ पर्यंत बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मृत खातेदारांच्या वारसांची वारस नोंदी सहज व वेगाने होण्याच्या दृष्टीने राज्यात जिवंत सातबारा मोहीम राबविण्यात येत असल्याबाबत

**(३७) ११५६५ (२१-०७-२०२५). श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मृत खातेदारांच्या वारसांना शेत जमिनीशी संबंधित अधिकार सहज आणि वेगाने मिळावेत यासाठी "जिवंत सातबारा" मोहीम राज्यभरात माहे एप्रिल, २०२५ पासून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत व्यक्तींची नावे सातबाऱ्यावरून कमी करून वारसांची नोंद करण्यासाठीची प्रक्रिया किती कालावधीत पूर्ण केली जाणार आहे,

(३) असल्यास, यापूर्वी वारसांना मालकी हक्क मिळविण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल असून अशा वारसदारांच्या या मोहिमेअंतर्गत नोंदी केल्या जाणार आहेत काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सातबारा उताऱ्यावरील सर्व मयत खातेदारांच्या वारसाची नोंद घेण्याच्या दृष्टीने दिनांक १९ मार्च, २०२५ च्या शासन निर्णयाव्दारे जिवंत सातबारा मोहिम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर मोहिमेंतर्गत न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून गाव निहाय मयत खातेदारांच्या यादीचे वाचन, वारसासंबंधी कागदोपत्री पुरावा सादर करणे, स्थानिक चौकशी करून वारस ठराव मंजूर करणे, वारस फेरफारवर निर्णय घेणे ई. साठी दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते दिनांक १० मे, २०२५ या कालावधीत कालबध्द कार्यक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर मोहिमेत माहे ऑक्टोबर, २०२५ अखेर एकूण ३,१२,४२७ वारस फेरफार अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३,०७,५९१ वारस फेरफार मंजूर करण्यात आले असून त्यानुसार नोंदी घेण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील मौ. बा-हाळी, मुक्रमाबाद व जांब या गावात स्वतंत्र नगरपंचायत स्थापन करण्याबाबत

**(३८) ११५७३ (१८-०८-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील मौ. बा-हाळी, मुक्रमाबाद व जांब या गावात स्वतंत्र नगरपंचायत स्थापन करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केल्याचे माहे-एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गावात नगरपंचायत स्थापन करावी अशी स्थानिक लोकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगर पंचायत स्थापन करण्यात येणारी नविन गावे ही नगरपंचायत स्थापन करण्याच्या शासनाच्या प्रचलित निकषास पात्र असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिकांची मागणी विचारात घेऊन शासनाने नगरपंचायती स्थापन करण्यासंबंधाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे,

अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) हे खरे नाही,

अशा आशयाचे स्थानिक नागरिकांचे मागणी वजा निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार अभिप्राय सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिनांक १२ जून, २०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाफेड अंतर्गत शासकीय हमी केंद्र तालुका बीड येथील तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही होणेबाबत

**(३९) ११५७९ (२४-०७-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड तालुक्यातील चौसाळा, मांजरसुंबा येथे नाफेड कार्यालयाच्यावतीने संबंधित यशोदिप व यशोधन कृषी व पणन सहकारी संस्था मर्या. साखरे बोरगाव (ता.बीड) यांना हमी केंद्र चालविण्यासाठी नियुक्त केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित संस्थेच्या पुर्वीच्या व आजच्या कामाकाजाबाबत शेतकरी बांधवांकडून नोंदणी, बारदाणा तसेच शेतकऱ्यांच्या सातबारावरील पीक पेरावर नोंद नसतांना देखिल सोयाबीन खरेदी झालेली आहे व मापामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकाराच्या व इतर कामकाजाच्या बाबतीत आर्थिक बाबींची मागणी करण्यासंबंधीच्या तक्रारी प्राप्त असल्याच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी रितसर पत्राद्वारे विभागास कळविले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विभागातील सर्व नियमावलींची स्तरनिहाय चौकशी, शेतकरी बांधवांनी केलेल्या तक्रारीचे व आर्थिक अनियमिततेची सर्वरित्या वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवालनिहाय त्रयस्त समितीच्यावतीने चौकशी करून रितसर कार्यवाहीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी स्थानिक लोकप्रतनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा पणन अधिकारी, बीड यांच्यामार्फत सहाय्यक जिल्हा पणन अधिकारी यांनी कागदपत्रांची तपासणी करून दिनांक २७.०२.२०२५ रोजी सविस्तर चौकशी अहवाल सादर केला आहे.

चौकशी अहवालानुसार दोन्ही खरेदी केंद्रांनी नाफेडच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज केल्याचे आढळून आले आहे. तसेच खरेदीमध्ये कोणताही गैरप्रकार केल्याचे निर्दशनास आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महसूल विभागाचा नविन आकृतीबंध तयार करण्याबाबत

**(४०) ११६४३ (२०-०७-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महसूल विभागाच्या सन २०१४ च्या आकृतीबंधात ६०० उपजिल्हाधिकारी व २०० अपर जिल्हाधिकारी ही पदे निश्चित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या महसूल विभाग सोडून इतर विभागात १५० उपजिल्हाधिकारी आणि ५० अपर जिल्हाधिकारी प्रतिनियुक्तीवर सेवा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढलेली लोकसंख्या, महानगरपालिका, विविध महामंडळे, भूसंपादन, पुरवठा विभाग, म्हाडा, व औद्योगिक विकास महामंडळे या ठिकाणी अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व तहसीलदार पदांच्या जागा वाढविण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महसूल विभागाचा नविन आकृतीबंध तयार करणे आवश्यक आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) सध्या महसुल विभाग सोडून इतर विभागात उप जिल्हाधिकारी संवर्गातील १५५ आणि अपर जिल्हाधिकारी संवर्गातील ८९ इतके अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत.
(३), (४) व (५) विविध महानगरपालिका, महामंडळे, म्हाडा व अन्य संस्थांसाठी अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी व तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची आवश्यकता विचारात घेऊन संबंधित विभागांकडून मागण्या प्राप्त झाल्यास आवश्यकतेनुसार जागा वाढविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## उमदी (ता.जत, जि.सांगली) परिसरात (जत पूर्व भाग) येथे २००KV/ १३२KV/ ३३KV उपकेंद्र स्थापन करण्याबाबत

**(४१) ११६६२ (०७-०८-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमदी (ता.जत, जि.सांगली) परिसरात (जत पूर्व भाग) येथे वाढत्या वीज मागणी व अपारंपारिक ऊर्जा (Solar and Wind Energy) क्षमतेच्या दृष्टीने २००KV/ १३२KV/ ३३KV उपकेंद्राची आवश्यक असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमदी (ता.जत, जि.सांगली) परिसरात (जत पूर्व भाग) येथे २००KV/ १३२KV/ ३३KV उपकेंद्र स्थापन करण्याबाबतची मागणी जत विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सांगली जिल्ह्याच्या जत तालुक्यात महापारेषण कंपनीची २२० के.व्ही जत व ११० के.व्ही. संख ही उपकेंद्रे कार्यान्वित असून या उपकेंद्रांमध्ये पुरेशी क्षमता शिल्लक आहे. तसेच भविष्यात महावितरण कंपनीकडून जत तालुक्यात उमदी येथे अति उच्चदाब उपकेंद्र उभारण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रणाली अभ्यासाद्वारे सुसाध्यता तपासून पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोना संसर्गाचा प्रसार रोखण्यासह कोव्हीड लसीबाबतची संभ्रमावस्था दूर करण्याबाबत**

**(४२) ११६९३ (१९-०९-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, पनवेल इत्यादी भागात कोरोना बाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या पंधरवाड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, आतापर्यंत या रोगाची किती व्यक्तींना लागण झाली व किती रुग्णांचा मृत्यु झाले आहेत,
(३) तसेच, राज्यातील तरुण युवक/ युवतींचा ह्रदयविकार, मेंदूचा झटका, अर्धांगवायू इत्यादीमुळे अकस्मात मृत्यू होण्याच्या घटना वारंवार निदर्शनास आल्या असून असे अचानक मृत्यू कोव्हीडची लस घेतल्यामुळे होत असल्याची भावना जनमानसात निर्माण झालेली असल्यामुळे कोव्हीडची लस घेतलेल्या नागरिकांमध्ये भिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सदर साथ आटोक्यात आणण्यासाठी व इतरत्र प्रसार होऊ नये यासाठी करावयाची उपाययोजना तसेच कोव्हीड लसीबाबतची संभ्रमावस्था दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१२-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक १९ जून, २०२५ पर्यंतची कोरोना रुग्ण सद्य:स्थिती
१) मुंबईमध्ये ९१२ व्यक्तीना कोरोनाची लागण झाली असून ६ मृत्यूंची नोंद झाली आहे.
२) ठाण्यामध्ये २८३ व्यक्तींना कोरोनाची लागण झाली असून १० मृत्यूंची नोंद झाली आहे.
३) पनवेलमध्ये २२ व्यक्तींना कोरोनाची लागण झाली असून कोरोनामुळे मृत्यू झाल्याची नोंद नाही.
४) दिनांक १९ जून, २०२५ अखेर राज्यात एकूण २२२८ कोरोना रुग्णांची नोंद झाली असून कोरोनामुळे ३२ मृत्यू झालेले आहेत.
(३) केंद्रीय सर्वेक्षण कक्ष, आय.डी.एस.पी., दिल्ली यांचेकडून प्राप्त दिनांक २३ जून, २०२५ रोजीच्या ई-मेलद्वारे सदर प्रश्नासंबंधी आय. सी. एम. आर. (I.C.M.R.) संस्थेने सादर केलेला संशोधन अहवाल प्राप्त झाला आहे.

या अहवालानुसार, कोविड-१९ लसीकरण तरुण वयातील अचानक मृत्यूबाबत कारणीभूत नाही याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. या अभ्यासात असे दर्शवले आहे की, कोविड-१९ मुळे तातडीने रुग्णालयात दाखल होणे तसेच, अचानक मृत्यूसाठी कौटुंबिक इतिहास कारणीभूत असणे आणि काही जीवनशैलीचे वर्तन जसे की अत्याधिक मद्यपान, प्राणघातक शारीरिक क्रिया या सर्वांचा आकस्मिक मृत्यूशी संबंध आहे.

परंतु लसीकरण हा आकस्मिक मृत्यूस कारणीभूत असणारा घटकांपैकी घटक नाही असे म्हणता येऊ शकते असे वरील संशोधन निष्कर्ष दर्शविते.

(४) कोव्हीडसंदर्भात खालीलप्रमाणे आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत :-

• सर्वस्तरावर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यामध्ये नागरिकांनी घाबरुन न जाता त्वरित सरकारी दवाखाना/ रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

• सर्व आरोग्य केंद्र दवाखाने व रुग्णालयामार्फत I.L.I. (Influenza like illness) आणि SARI (Severe Acute Respiratory infection) यांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

• रुग्णालयामध्ये RTPCR चाचणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

• शासकीय रुग्णालयात ऑक्सीजन पुरवठा सुरळीत व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन ठेवण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ससून रुग्णालयात दाखल झालेल्या वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारींचे निवरण जलद गतीने होण्याबाबत करावयाची उपाययोजना

**(४३) ११७२९ (३०-०७-२०२५). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूणे शहरातील ससून रुग्णालयात सन २०१९ पासून आजतागायत दाखल झालेल्या वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारीबाबच्या प्रकरणांचा अहवाल तयार करताना तांत्रिक व प्रशासकीय अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात पुणे शहरासह इतर जिल्ह्यांतून आलेल्या तक्रारींची प्रकरणे येत असून उपचारांबाबतची कागदपत्रे अपूर्ण असलयाने अनेकदा बैठका लांबतात या कारणास्तव या रुग्णालयात तक्रार निवारण करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीवर ताण येत असून समितीस अहवाल तयार करण्यास देखिल विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात प्राप्त तक्रारीपैकी एकूण किती प्रकरणमध्ये निष्काळजीपणा झाला असल्याचे ठपके ठेवण्यात आले आहेत,

(४) असल्यास, याबाबत शरानाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार, ससून रुग्णालयात वैद्यकीय निष्काळजीपणास्तव प्रप्त झालेल्या तक्रारींचे जलद गतीने निवारण करण्याबाबत सुधारित कार्यपद्धती तसेच संबंधित जिल्ह्यांतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये किंवा जिल्हा रुग्णालयांनी त्यांची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पुणे ससून सर्वोपचार रुग्णालयाकडे पुणे शहरासह इतर जिल्ह्यांमधून वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारी येतात. या तक्रारींवर शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०१४ नुसार जिल्हास्तरीय तज्ज्ञ समिती नेमली जाते.

समिती तक्रारींची कागदपत्रे तपासते, परंतु अनेक वेळा आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असल्याने ती संबंधित पोलीस स्टेशनकडून मागवावी लागतात. पोलीसांकडून ही कागदपत्रे उशिरा मिळाल्याने प्रकरणांवरील अहवाल तयार करण्यात विलंब होतो.

तसेच, अनेक समिती सदस्यांच्या बदली किंवा प्रतिनियुक्तीमुळे समित्यांचे पुनर्गठन करावे लागते, ज्यामुळे अहवाल प्रक्रियेत आणखी उशीर होतो.

(३) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे प्राप्त तक्रारींपैकी कार्यवाही पूर्ण झालेल्या तक्रारीमधील १४ प्रकरणांमध्ये निष्काळजीपणा झाला असल्याचे ठपके ठेवण्यांत आलेले आहेत.

(४) वैद्यकीय निष्काळजीपणाच्या तक्रारी या पोलीस स्टेशनकडून रुग्णालयांस प्राप्त होत असतात. त्यामुळे सदर तक्रारींचे अहवाल हे रुग्णालयातर्फे पोलीस अधिक्षक यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यांत येतात. सदर अहवाला आधारे पोलीस यंत्रणा डॉक्टर/रुग्णालय यांच्याविरुध्द पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुन वस्त्रोद्योगाला चालना देण्याबाबत

**(४४) ११७३३ (३०-०७-२०२५). श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर (शिरोळ) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा व तांत्रिक प्रगती सोबत सहकारी आणि खाजगी सूतगिरण्यांना समान अनुदान देण्यासाठी शासनाने विविध योजना आणि उपायांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये वस्त्रोद्योग धोरण राबविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सहकारी सूतगिरण्यांना सौर ऊर्जा प्रकल्प राबविताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वस्त्रोद्योग धोरण सन २०२३-२०२८ अंतर्गत "ओपन ॲक्सेस" मधून वीज जोडणी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे, अद्यापपर्यंत त्याची कोणतीही अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे (१२-११-२०२५) :** (१) शासन निर्णय दिनांक ०२ जून, २०२३ अन्वये राज्याचे नवीन एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ जाहिर करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना शासकीय भागभांडवल, महाटफ अंतर्गत भांडवली अनुदान, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भांडवली अनुदान तसेच प्रति युनिट रु. ३/- प्रमाणे वीजदर अनुदानाचा लाभ देण्यात येत आहे.

तर, राज्यातील खाजगी सूतगिरण्यांना भांडवली अनुदान, महाटफ अंतर्गत भांडवली अनुदान, सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भांडवली अनुदान तसेच प्रति युनिट रु. २/- प्रमाणे वीजदर अनुदानाचा लाभ देण्यात येत आहे.

(२) सौर ऊर्जेचा वापरासंबंधाने प्रामुख्याने १ मेगावॅट नेट मिटरींगची अट, सौर ऊर्जा प्रकल्प उभारल्यावर लोड फॅक्टर इन्सेंटीव्ह, बल्क कंझमशन रिबेट, इन्क्रिमेन्टल कन्ड्झमशन रिबेट सवलती महावितरणकडून दिल्या जात नसणे, भांडवली गुंतवणुकीसाठी निधी उपलब्ध नसणे इत्यादी अडचणी सहकारी सूतगिरण्यांना सौर ऊर्जा प्रकल्प राबविताना येत असल्याचे सहकारी सूतगिरण्यांनी वस्त्रोद्योग आयुक्तालय कार्यालयास सादर केलेल्या निवेदनामध्ये नमूद केलेले आहेत.

वस्त्रोद्योगामध्ये सौर ऊर्जेच्या वापरामध्ये येणाऱ्या समस्या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ऊर्जा विभागाने अ.मु.स. (उर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
(३) व (४) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत "ओपन अॅक्सेस" मधून वीज जोडणी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीव्हीजी इंडिया लिमिटेड कंपनी काळ्या यादीत असतानाही पुणे महानगरपालिकेने कंपनीला घनकचरा कामाची निविदा दिल्याबाबत

**(४५) ११७४० (२१-०७-२०२५). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील बीव्हीजी इंडिया लि.कंपनी काळ्या यादीत समाविष्ट असतानाही महानगरपालिकेकडून नियम डावलून सदर कंपनीला घनकचरा कामाची निविदा देण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधित घनकचरा, विधी व दक्षता विभाग यांनी दिलेले अभिप्राय देखील विचारात घेण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन धोरणानुसार काळ्या यादीतील किंवा न्यायालयीन वादग्रस्त कंपन्यांना निविदा देण्यास बंदी असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही, खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर कंपनीची निविदा रद्द करणेबाबत तसेच यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) M/s BVG INDIA LIMITED, Pune यांच्या ब्लॅकलिस्टिंग बद्दल पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या तक्रारीची घनकचरा, विधि व दक्षता विभागामार्फत शहानिशा करुन M/s BVG INDIA LIMITED, Pune यांची निविदा स्थायी समितीच्या मान्यतेने स्विकृत करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन निर्णय यांच्या आधारे करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूरमधील औष्णिक वीजनिर्मिती केंद्र व कोळसा खाणींमुळे वाढते प्रदूषण

**(४६) ११७५१ (०९-१०-२०२५). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महानिर्मिती वीजनिर्मिती केंद्र व वेकोलिच्या कोळसा खाणीमुळे परिसरातील प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात हवेच्या गुणवत्तेची (Air Quality Index) मोजणी नियमितपणे केली जाते काय तसेच औद्योगिक प्रकल्पांना कोणते दंड किंवा निर्देश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वेकोलिच्या कोळसा खाणी व महानिर्मिती केंद्रामार्फत होणाऱ्या प्रदूषणाचे नियंत्रण करण्यासाठी

कोणती उपाययोजना केली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांचे आरोग्य व पर्यावरण रक्षणासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधिन परिसरात श्वसनाचे आजार दमा, न्युमोनिया, त्वचेचे आजार इत्यादी आजारांवर वेळीच उपचार करण्यात येत असल्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याच्या समस्या दिसून आलेल्या नाहीत.
(२), (३) व (४) हे खरे आहे.

हवा गुणवत्ता पृथ:करण अहवाल विहित मर्यादेपेक्षा जास्त आढ़ळल्याच्या कारणास्तव व उद्योगांनी संमतीपत्रातील अटीव शर्तींचे उल्लंघन केल्याच्या कारणास्तव

(i) मे. दुर्गापूर खुली खाण या खाणीस दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले असून रु.१५ लक्ष बॅंकहमी जप्त करण्यात आली आहे.

(ii) मे. वेकोलि बल्लारपूर खुली खाणीस दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(iii) मे. वेकोलि नांदगाव इन्क्लाईस भुमिगत खाणीस दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले आहेत.

(iv) मे. वेकोलि न्यु माजरी अंडरग्राऊंड टु ओपनकास्ट माईन खाणीस दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

(v) प्रदूषणाचे नियंत्रण करण्यासाठी कोळसा खाणींनी पाणी फ़वारणी यंत्रणा, पाण्याचे फ़वारे, कन्व्हेअर बेल्टवर आच्छादन बसविलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील इलेक्ट्रिक वाहनांना टोलमुक्ती देण्याच्या निर्णयाबाबत

**(४७) ११७९० (०८-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात चारचाकी ईव्ही आणि इलेक्ट्रिक बस यांना शिवडी-न्हावा, शेवा अटल सेतू, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गावर पूर्ण टोलमाफी तर राष्ट्रीय व राज्य महामार्गवर ५० टक्के टोलमाफी देण्याचा निर्णय दिनांक २९ एप्रिल-२०२५ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे मे-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इलेक्ट्रिक वाहनांना टोलमुक्ती देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

शासनाचे महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५–गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर -०१२५/ प्र. क्र.१३/परि-२, दिनांक २३.०५.२०२५ अन्वये मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग या दोन्ही महामार्गावर तसेच, अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना संपूर्ण १०० टक्के पथकर माफी देण्याबाबत धोरण तयार करण्यात आले आहे.

(२) व (३) शासनाने दिनांक २२.८.२०२५ पासून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गासाठी तसेच, दिनांक २१.०८.२०२५ पासून शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना १०० टक्के टोलमाफी देण्यासंदर्भात अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय शिक्षण विभागातील बालभारतीच्या पुस्तकांत कोऱ्या पानांसाठी झालेल्या खर्चाबाबत

**(४८) ११७९३ (०८-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांत विद्यार्थ्यांना लेखनासाठी वह्यांची कोरी पाने समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानंतर तो मागे घेण्यात आलेला असला, तरीही त्यासाठी रुपये ६३ कोटी ६३ लाख ५३ हजार इतका खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे झालेल्या खर्चानंतर भविष्यात शालेय शिक्षणासाठी व्यवहार्य निर्णय घेता यावेत, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०८ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये २ री ते ८ वी च्या पाठ्यपुस्तकांत वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला होता.

(२) अंशत: खरे आहे.

दिनांक २८ जानेवारी, २०२५ च्या शासन निर्णयान्वये पाठ्यपुस्तकांत वह्यांची पाने समाविष्ट करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. उपरोक्त शासन निर्णय रद्द झाल्यानंतर यान्वये कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

(३) भविष्यात हे टाळण्याकरीता कोणताही निर्णय घेताना अंमलबजावणी करण्यात येणा-या उपक्रमाची प्रायोगीकता व त्याचा वित्तियभार या सर्व बाबी तपासून निर्णय घेतला जाणार आहे. तसेच उपक्रमाचा प्रभाव बघण्यासाठी “पथदर्शी प्रकल्प” यांच्या माध्यमाद्वारे उपक्रमाची सफलता बघून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाकडून विधवा तसेच अपंगांना मिळणारे मानधन बहुतांश ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मागील पाच महिन्यापासून मिळाले नसल्याबाबत**

**(४९) ११७९५ (१८-०८-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार योजनेत विधवा अथवा अपंग या लाभार्थ्यांसाठी दर महिन्याला मानधन दिले जाते परंतू राज्यातील बहुतांशी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मागील पाच महिन्यापासून मिळाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानधन मिळावे यासाठी तहसिल कार्यालयात लाभार्थी रोज ये-जा करत असून दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना नियमीत मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (१०-११-२०२५) :** (१) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे आधार बँक खात्याशी लिंक नसणे, आधार अद्ययावत नसणे, आधार प्रमाणीकरण नसणे, तसेच दिव्यांग लाभार्थ्यांचे बोटांचे किंवा डोळयांचे ठसे स्कॅन न होणे, अशा विविध कारणांमुळे काही लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मिळत नाही, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) संजय गांधी निराधार अनुदान योजना या योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य डी.बी.टी पोर्टलद्वारे माहे डिसेंबर, २०२४ पासून देण्यात येत आहे. या योजनेतील लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणेबाबत तसेच त्यांचे बँक खाते आधारशी संलग्न करण्याबाबत शासनातर्फे जिल्हा/तालुका/मंडळस्तरावर युद्धपातळीवर विशेष मोहिम राबविण्याच्या सूचना वेळोवळी सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आहेत. तसेच शासनाकडून लाभार्थ्यांचे Aadhar अद्ययावत करणे व त्यांची माहिती डी.बी.टी. पोर्टलवर भरणेबाबत माहे मार्च, २०२४ पासून सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने पत्राद्वारे व VC द्वारे पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेळघाटामधीन बालकांचे कुपोषण कमी करणे तसेच आदिवासींच्या आरोग्याच्या सुविधा तातडीने सोडवण्यासाठी डॉक्टर व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत**

**(५०) ११८२० (१९-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे १० हजारांवर बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले असून सन २०२१-२२ मध्ये ११३ उपजत मृत्यू, सन २०२२-२३ मध्ये ७९ मृत्यू, सन २०२३-२४ मध्ये ७२ मृत्यू तर सन

२०२४ मध्ये ७ महिन्यात ४९ उपजत बालकांचा मृत्यू झालाआहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, जिल्हयातील चिखलदरा तालुक्यातील अतिदुर्गम एकताई गावात असलेला आयुर्वेदिक दवाखाना प्रशासनाकडून मागील ३ वर्षापासून बंद ठेवण्यात आल्याने गोरगरीब आदिवासींची गैरसोय होत असल्याने शासनाने डॉक्टरांची नियुक्ती करून दवाखाना नियमित सुरु करण्याची मागणी खोज संस्थेने दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून सुरू असलेल्या राष्ट्रीय आरोग्य मिशनतंर्गत (एनआरएचएम) आर्थिक वर्षात ९० कोटींच्या नवीन आराखड्याला अद्यापही मंजुरी मिळाली नसल्याने माहे मार्च महिन्याचे कर्मचाऱ्यांचे वेतन देखील अद्यापही झालेले नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनस आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने आढावा घेऊन मेळघाटामधील बालकांचे कुपोषण कमी करणे तसेच तेथील आदिवासींना आरोग्याच्या सुविधा तातडीने उपलब्ध करणेसाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विजलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१२-०१-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
मेळघाट (जि. अमरावती) येथे १० हजारांवर बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार तीव्र कुपोषित बालके १२२ आणि मध्यम कुपोषित बालके १७६७ असल्याचे आढळून आले आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये ११३ उपजत मृत्यू, सन २०२२-२३ मध्ये ७९ मृत्यू, सन २०२३-२४ मध्ये ७२ मृत्यू आणि सन २०२४ मध्ये ७ महिन्यात ४९ उपजत बालकांचा मृत्यू झाला आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
एकताई गावातील आयुर्वेदिक दवाखान्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सदर वैद्यकीय अधिकारी त्याठीकाणी अनधिकृतरित्या गैरहजर होते त्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत असून
(३) सदर रिक्त पदावर दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची तात्पुरती पदस्थापना करण्यात आली. सद्यस्थितीत सदर दवाखान्यात समुपदेशनाने वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.
अमरावती जिल्ह्याकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत रु. ३४५.१४ लक्ष एवढे अनुदान वेतना करीता प्राप्त झाले असून वेतन अदा करण्यात आले आहे.
(४) महिला व बाल विकास विभागाकडून प्राप्त माहिती नुसार कुपोषण कमी करण्यासंदर्भात शासनामार्फत खालील प्रमाणे कार्यवाही केली जात आहे.

१) अमृत आहार योजनेअंतर्गत गरोदर माता व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार व ६ महीने ते ६ वर्ष बालकांना अंडी / केळी तसेच पुरक पोषण आहार देण्यात येतो.

२) VCDC मध्ये गाव स्तरावरुन ग्राम पंचायतच्या ५% पेसा फंड मधून तीव्र कमी वजन बालके व मध्यम कुपोषीत बालके यांना जिल्ह्याच्या नाविन्य पुर्ण उपक्रमा मधून अमायलेज युक्त पीठाचे वेग वेगळे खाद्य पदार्थ दिले जातात.

३) मिशन २८ अंतर्गत गरोदर माता यांना प्रसुतीपूर्व प्रसुतिनंतर गृह भेटी व अंगणवाडी सेविका, आशा मार्फत मार्गदर्शन करण्यात येते.

४) आदिवासींच्या आरोग्याच्या समस्या तातडीने सोडवण्याठी डॉक्टर व कर्मचा-याची नियुक्ती करण्याची प्रक्रिया पूर्ण करुन रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.